| पो.स्टेशन/अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| चामोर्शी अप. क्र. ४१/२०२०<br>कलम ६५(अ),८३,९८महा.<br>दारुबंदि अधि. | मौजा चामोर्शी ३२ किमी दक्षिण<br>**घटना ता. वेळ :-**<br>दिनांक २८.०१.२०२० चे ११.३० ते १२.४५ वा.पर्यत | सरकार तर्फे :- सफौ/७८७ दादाजी मंगरुजी करकाडे, नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली<br>अटक आरोपीतांचे नाव :-<br>१. राकेश निखील अधिकारी रा. चामोर्शी<br>२. आकाश ठाकुर गोंडाणे रा.गांधीनगर नागपुर<br>३. चंद्रकात घनश्याम बोरकर रा.वैशाली नगर नागपुर<br>४. अनील रुपचंद खोब्रागडे रा. शांतीनगर ईतवारी नागपुर |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैध दारु रेड मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | पोलीस निरीक्षक उल्हास पी. भुसारी,पोउपनि भागवत कदम, सफौ/ दादाजी करकाडे, पोहवा/भाऊराव बोरकर, पोहवा/निलकंठ पेंदाम, मपोना/पुष्पा कन्नाके पोशि/मंगेश राऊत,पोना/सुनील पुट्टावार, चापोना/सिध्दु बाबर, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक, कार्या. गडचिरोली | |

महाराष्ट्र शासनाने सन १९९२ पासुन गडचिरोली जिल्हा हा दारुबंदि जिल्हा म्हणुन घोषीत केला असतांना सुध्दा गडचिरोली जिल्हायातील काहि अवैध दारु विक्रेते हे शेजारील आध्रप्रदेश,छत्तीसगड, मध्यप्रदेश तसेच सिमावर्ती गोंदिया, भंडारा, तसेच नागपुर जिल्हयातील अनुज्ञाप्तीधारक दारु विक्री दुकाणातुन दारुची खरेदी करुन चारचाकी तसेच दुचाकी वाहनाने आडमार्गाने बेकादेशिर वाहतुक करुन स्थानिक चिल्लर दारु विक्रेत्यांना घरपोच दारुचा पुरवठा करीत असतात, अशा अवैध दारु विक्रेत्यांवर अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवसायांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक २८.०१.२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथकास गोपनिय सुत्रांकडुन माहिती मिळाली की, मौजा चामोर्शी येथील ठोक दारु विक्रेता राकेश निखील अधिकारी याचे सांगणेवरुन नागपुर येथील दारु पुरवठादार नामे १. चंद्रकांत बोरकर, २.अनिल खोब्रागडे, ३. आकाश गोंडाणे, सर्व रा. नागपुर हे इसम त्यांचे ताब्यातील चारचाकी मालवाहु टाटा सुपर वाहन क्रमांक एमएच ४९ डी ६४७८ या वाहनाने देशी-विदेशी दारुचा मोठया प्रमाणात बेकायदेशिर वाहतुक करुन पुरवठा करणार आहेत अशा माहितीवरुन मा. श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग, अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) यांना माहिती देवुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडील वर नमुद पोलीस पथक हे मौजा चामोर्शी येथे पोहचुन राकेश अधिकारी यांचे घराचे आजुबाजुला सापळा रचुन पाळत ठेवुन असतांना मिळालेल्या माहितीप्रमाणे नमुद क्रमांकाचे चारचाकी वाहन हे राकेश अधिकारी यांचे घरासमोर पोहचले असता, चारचाकी वाहनासह आलेले तिन इसम हे नमुद चारचाकी वाहनात ठेवुन असलेले दारुचे बॉक्स वाहनामधुन उतरवुन राकेश निखील अधिकारी यांचे राहाते घरी ठेवत असल्याचे दिसुन आल्याने पोलीस पथकाने सदर ठिकाणी अवैध दारु संबधात रेड केला असता, एकुन ६,०७,०००/- रुपये किमंतीची देशी-विदेशी दारु, दारुचे बेकायदेशिर वाहतुकी करीता वापरती ५,०००००/- रुपये किंमतीचे चारचाकी वाहन तसेच संपर्काकरीता वापरलेले एकुन ७१,०००/- रुपये किमंतीचे मोबाईल असा एकुन ११,७८,०००/- रुपये किमंतीचा मुद्देमाल घटनास्थळावरुन जप्ती करुन ताब्यात घेवुन गुन्हयातील आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन चामोर्शी येथे दिनांक २८.०१.२०२० रोजी वरील नमुद कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडील पथका कडुन गडचिरोली जिल्हयात अहोरात्र अवैध दारु रेड संबधात मोहिम राबवुन करीत असलेल्या प्रभावी कारवाई मुळे अवैध दारु विक्रि करणारे तसेच बेकायेशिर रित्या दारुची वाहतुक करणा-या लोकांचे धाबे दणानले आहेत.


MH.49.D.6478